# नियमित दिवाणी मुकदमा क्र.२८/२००८ मधील नि.क्र.२११ खालील आदेश
## (शंकर शामराव कदम *विरुध्द* अजित पांडूरंग दगडे (सुर्यवंशी) वगैरे–२०)
## (CNR-MHSN090005372008)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि.१४.११.२०१८ रोजी नि.२०१ प्रमाणे दाखल केलेल्या तीन कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी व ती पुराव्यात वाचण्यात यावी याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील वाद मिळकत वादी व प्रतिवादी क्र.९ ते २० चे पूर्वजांनी दि.२६.०९.१९४९ रोजी तुकाराम आबा कदम व कृष्णा दौलता खराडे (दगडे) यांचेकडुन खरेदी घेतली आहे. त्यापुर्वी दि.१६.११.१९३८ रोजी वाद मिळकत वादीचे पूर्वजांना बक्षीसपत्राने मिळाली आहे. दि.१४.११.२०१८ रोजी नि.२०१ सोबत सदर खरेदीपत्र, खरेदीपत्र मोडी लिपीमधुन मराठी भाषेत अनुवाद केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व या कागदपत्रासंबंधी वादीने स्वतः पुरावा दिला आहे. तसेच वादीने प्रतिवादीचा उलटतपास घेतेवेळी प्रतीवादी तर्फे साक्षीदार वसंत निंबाळकर यांना प्रश्न विचारले आहेत. प्रतिवादी यांनी सदर खरेदीपत्र मान्य केल्याने व ते दावा मिळकतीतील वादी व प्रतिवादी यांचे हक्क संबंध स्पष्ट करणारे आहे. तसेच, दावामिळकतीसंबंधी असणारी संदिग्धता व दावा मिळकतीची मालकी सुस्पष्टपणे होणेकरीता सदर कागदपत्रे पुराव्याचे कामी वाचणेत यावीत व त्यांना निशाणी देणेत यावी.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ यांनी नि.२१३ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत दर्शवली आहे. प्रतिवादी क्र.१ चे कथनाप्रमाणे तुकाराम दादु माळी यांचे शपथपत्र फार जुने असुन सन २००८ साली करण्यात आलेले आहे. सदर कागदपत्रे वादींना पक्षकारांचे जबाब होण्यापुर्वी सादर करण्यास काहीही अडचण नसताना फार उशिराने सदर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामुळे प्रतिवादीना त्याबाबत संधी उपलब्ध होत नाही. असे कागद पुराव्यात वाचणेत येवु नयेत व त्यांना निशाणी देण्यात येवू नये. दाव्याचे काम थांबविण्याचे हेतुने वादीने अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज रद्द करणेत यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी दावा कलम १ मधील मिळकतीत केलेले अतिक्रमण काढावे व त्यामधील वहिवाटीस हरकत करु नये, झाडे तोडु नयेत, विहीरीवर कब्जा करु नये अशी निरंतर ताकीद मिळावी याकरीता केलेला आहे. यावरुन वादी यांची केवळ प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचेविरुध्द मागणी असल्याचे दिसून येते. याकामी वादीनी

नि.१९४ प्रमाणे दि.२०.०७.२०१८ रोजी व प्रतिवादी यांनी दि.१९.१२.२०१८ रोजी पुरावा संपलेली पुरसिस दिलेल्या आहेत. वादीने त्याचे दाव्यामध्ये दि.२६.०९.१९४६ चे खरेदीपत्र, त्याचे भाषांतर व त्यासी अनुषंगिक केलेले शपथपत्र याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता, सदर कागदपत्रे वादीचे ताब्यात सन-२००८ म्हणजे दावा दाखल तारखेपासुन आहेत हे स्पष्ट दिसुन येते. वादी यांनी सन-२००८ पासुन वादीचा पुरावा संपेपर्यत सदर कागदपत्रे त्याचे ताब्यात असुनही व ती दावा मिळकत, वादीचे मालकी कब्जेवहिवाट यांचेशी संबंधित असुन व दाव्यातील महत्वाचा लेखी पुरावा असल्याचे माहीत असुनही वेळीच दाखल केलेली नाहीत. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, सदर कागदपत्रे वादीने त्याचे पुराव्यात दाखल का केली नाहीत व ती प्रतिवादीचे पुराव्याचेवेळी का दाखल करणेत आली, सदर कागदपत्रे दाखल करणेस का विलंब झाला याची समाधानकारक कारणे अर्जामध्ये दिलेली नाहीत.

५. प्रतिवादी तर्फे साक्षीदाराचा पुरावा पाहता, प्रतिवादी यांनी या कागदपत्रांशी संबंधी कोणतीही कबुली दिलेली नाही. सदर कागदपत्रे वादीने प्रतिवादीचे पुराव्याचेवेळी दाखल केली व उलटतपासावेळी दाखवून प्रश्न विचारले यावरुन सदर कागदपत्रे शाबीत झाली असे अनुमान काढता येणार नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम १४(१)(२) व आदेश १३ नियम १ प्रमाणे वादीने त्याचे ताब्यात असणारी व ज्यावर तो विसंबुन आहे, जी दाव्यातील मागणीशी संबंधित आहेत अशी कागदपत्रे दाव्यासोबत दाखल करावी व त्याच्या प्रती प्रतिवादींना दयाव्यात असा बंधनकारक नियम आहे. तसेच, अशी कागदपत्रे त्याचे ताब्यात नसल्यास ती कोणाच्या ताब्यात आहेत याची वस्तुस्थिती स्पष्ट करावी असेही बंधनकारक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता ७ नियम १४(३) प्रमाणे जी कागदपत्रे वादीने न्यायालयात सुरुवातीस दाखल करणे बंधनकारक आहेत ती कागदपत्रे वादीने नंतर दाखल केल्यास न्यायालयाचे परवानगी खेरीज पुराव्यात वाचता येणार नाही असा बंधनकारक नियम दिलेला आहे.

६. प्रस्तूतकामी वादीने नि.२०१ सोबत दाखल केलेल्या सन-१९४६ मधील कागदपत्राचा स्पष्टपणे उल्लेख दाव्यात केलेला नाही. सदर कागदपत्रे वेळेत न्यायालयात दाखल केलेली नाहीत. दि.१४.११.२०१८ रोजी, वादीचा पुरावा संपल्यानंतर अशी कागदपत्रे दाखल करुन अंतिम युक्तिवादाचेवेळी दि.२१.०१.२०१९ रोजी सदर कागदपत्रांना निशाणी देणेत येवुन पुराव्यात वाचणेत यावीत असा मोघम स्वरुपाचा अर्ज अत्यंत विलंबाने दिलेला आहे. सदर कागदपत्रे सन-२००८ पासुन दि.१४.११.२००८ पर्यत वादी याकामी का दाखल करु शकलेला नाही

याबाबत योग्य व संयुक्तिक कारणे देवुन विलंब समाधानकारकपणे स्पष्ट केलेला नाही. यावरुन वादीचा दावा, दाव्यातील मागणी व वादी देत असलेला पुरावा याबाबत वादी सजग व सर्तक नसल्याचे व कायद्यातील तरतुदीचा गैरवापर करुन, जाणीवपुर्वक योग्यवेळी पुरावा दाखल न करता, काम प्रलंबीत ठेवणेकरीता, युक्तिवादास विलंब होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दिल्याचे स्पष्ट होते. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे बचाव व हक्कांवर याचा परिणाम होणार आहे व प्रतिवादींना याबाबत पुरावा देण्याची संधी मिळणार नाही. सबब, या सर्वाचा विचार करता वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, आदेश खालीलप्रमाणे,

## :: आदेश ::

१. वादीचा नि.२११ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदर दावा १० वर्षापेक्षा जास्त जुना असल्याने लवकरात लवकर युक्तीवाद करावा.

**स्वाक्षरी/-**

**तासगांव.** **(श्रीमती एस.एस. मांजरेकर)**

**दि.२५.०२.२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**